## <u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग</u>

### मुंबई मेट्रो ३ च्या प्रवाशांना मिळणार अखंडीत मोबाईल आणि इंटरनेट सेवा

**मुंबई, २७ सप्टेंबर, २०२३ -** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ.) च्या वतीने मेट्रो-३ मार्गाला दूरसंचार पायाभूत सुविधा प्रदान करण्याकरिता दूरसंचार सुविधे संदर्भात इन-बिल्डिंग सोल्यूशन्ससाठीचे कंत्राट दिले. हे कंत्राट सौदी अरेबियामधील रियाध शहरात स्थित असलेल्या ACES या कंपनीच्या ACES इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या उपकंपनीला निविदा प्रक्रियाद्वारे देण्यात आले आहे. यामुळे आता ॲक्वालाईन मार्गातील प्रवासात अखंडित मोबाईल आणि इंटरनेट सेवा प्रवाशांना मिळणार आहे.

यापूर्वी ACES इंडिया या कंपनीने बंगळुरू विमानतळ आणि सूरत डायमंड बोर्स येथे मोबाईल व इंटरनेट सेवा प्रदान केली आहे.

मुंबई मेट्रो-३ मार्ग संपूर्णपणे भूमिगत असल्याने, स्थानकातील तिकिट खिडकी (Concourse level) हे जमिनीच्या खाली १०.१४ मीटर तर प्लॅटफॉर्म हे जमिनीच्या खाली १८-२० मीटर खोल आहेत. त्यामुळे भुयारी मार्गात मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा उपलब्ध करणे हे या प्रकल्पातील एक महत्त्वाचे आव्हान आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी तसेच प्रवासादरम्यान प्रवाशांना अखंडीत मोबाईल आणि इंटरनेट सेवा सुनिश्चित करण्यासाठी मुं.मे.रे.कॉ.ने जिओ, वोडाफेन, एअरटेल आणि एमटीएनएल सारख्या मोबाईल सेवा प्रदात्यांकडून सेल्युलर कव्हरेज उपलब्ध करण्याची योजना आखली आहे. इन-बिल्डिंग सोल्यूशन्सद्वारे भुयारी मार्गातील स्थानके आणि बोगद्यांमध्ये अँटेना आणि रिपीटर्स बसवून हे साध्य केले जाईल.

याबाबत मुं.मे.रे.कॉ. च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या की, "मेट्रो-३ मार्गाद्वारे या उपक्रमातून तिकिट दराव्यतिरिक्त मिळणारे सर्वाधिक महसूल प्राप्त होणार आहे नॉन-फेअर बॉक्स (Non-Fare Box Revenue). इन-बिल्डिंग सोल्युशन्सद्वारे प्रवाशांना भूमिगत मेट्रो-३ मार्गातील प्रवासादरम्यान अखंडित मोबाईल आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा आनंद घेता येईल."

मुं.मे.रे.कॉ.चे संचालक (नियोजन आणि रिअल इस्टेट डेव्हलपमेंट/ NFBR), श्री. आर. रमणा यांनी बिल्डिंग सोल्यूशन्ससाठी देशातील आजपर्यंतचा सर्वाधिक वार्षिक प्रीमियम प्राप्त केल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. या प्रयत्नांमुळे मेट्रो-३ मार्गातील संचलनाला लक्षणीय मदत होणार असून सर्वाधिक प्रवासी या मार्गाशी जोडले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

मुं.मे.रे.कॉ.ला नॉन-फेअर बॉक्स महसूल (Non-Fare Box Revenue)निविदा प्रक्रियेत ऑटस-स्टुडिओपॉड (AUTUS-StudioPod) द्वारे सहाय्य केले जाते. (समाप्त)

For further information please contact: -


Vaidehi Khadse/Sr. AGM (PR)
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse/AM (PR)
8369727364
niti.tamse@mmrcl.com